ePaper

मुंबईत धावणारी मोनोरेल अचानक एका बाजूला झुकली, प्रवाशांत घबराट

| वर्ष - 9 | अंक - 5 | UDYAM-MH-26-0158827 |



# महाईन्यूज™

### आतील पानांत


- प्रज्ञानंदचा गुकेशवर विजय!
- 'पीसीबी'च्या करारात रिझवानची पदावनती
- ऑनलाइन गेमिंगवर येणार बंदी?
- बिहारमध्ये एकतर्फी मतचोरीला आळा?


www.mahaenews.com | बुधवार, दि. 20 ऑगस्ट 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

**मुंबईच्या स्पिरीटची वेदनादायी कहाणी** लोकल खोळंबल्या, मोनोरेल अक्षरश: झुकली

# डोळ्यांमध्ये पाणी पण मनामध्ये धैर्य!

## मोनोत जीव टांगणीला; प्रवाशांच्या भार असह्य, दीड तासानंतर दोनशे प्रवाशांची सुटका




### अतिरिक्त वजन

गाडीतून अंदाजे २०० प्रवाशांना बाहेर काढण्यात आल्याचे एमएमआरडीएतील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सांगितले. मोनोरेलची वजन पेलण्याची क्षमता १०४ मेट्रिक टन असताना मंगळवारी १०९ मेट्रिक टन इतके वजन होते. या अतिरिक्त वजनामुळे, गाडीतील अतिगर्दीमुळे गाडी कलंडून यांत्रिक संपर्क तुटला,वीज पुरवठा खंडीत होऊन गाडी बंद पडल्याचेही अधिकाऱ्यांनी सांगितले. गाडीतून बाहेर काढण्यात आलेल्या प्रवाशांना पालिकेच्या नजीकच्या दवाखान्यात तपासणी करण्यात आली.

### एमएमआरडीएकडून बैठक

मंगळवारची घटना अत्यंत गंभीर असून अग्निशमन दलाने प्रवाशांना बाहेर काढले नसते तर मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता होती. त्यामुळे या घटनेची दखल एमएमआरडीएने घेतली आहे. त्यानुसार बुधवारी या घटनेच्या अनुषंगाने एमएमएमओसीएलच्या अधिकाऱ्यांना एमएमआरडीएने बैठकीसाठी बोलावले आहे. तर अशा घटना भविष्यात घडू नये आणि घडल्या तर त्या योग्य प्रकारे कशा हाताळाव्यात यावरही चर्चा होणार आहे.

| मुंबई | प्रतिनिधी |
महाईन्यूज

**मुंबईच्या स्पिरीटची नेहमी चर्चा होत असते. मुंबईकर खूप जिद्दी आहेत. कितीही कठीण काळ येऊ द्या. मुंबईकर हा परिस्थितीला सामोरं जातो. तो परिस्थितीशी झुंज देतो आणि त्यातून बाहेरही पडतो. मुंबईकरांच्या या स्पिरीटची आताही चर्चा होतेय. कारण मुंबईवर आज नैसर्गिक आपत्ती आली. या आपत्तीत मुंबईकरांनी अनेक आव्हानांना तोंड दिलं. यानंतर लाखो नागरीक आपापल्या घरी पोहोचले आहेत.**

मुंबईत मंगळवारी सकाळपासून मुसळधार पाऊस सुरु होता. मुंबईची लाईफलाइन मानली जाणारी लोकल ही सकाळी सुरु होती. त्यामुळे अनेक चाकरमानी, सर्वसामान्य नागरीक आपापल्या विविध कामांसाठी मुंबईला रवाना झाले. ते आपापल्या हव्या असणाऱ्या स्थानकांवर पोहोचले. पण पावसाचा वेग वाढल्यानंतर कुर्ला, सायन, दादर या ठिकाणी रेल्वे ट्रॅकवर पाणी साचायला सुरुवात झाली. पावसाचा ओघ सुरुच होता. मुसळधार पावसामुळे मुंबईतील रस्ते पूर्णपणे जलमय झाले. लोकल ट्रेनदेखील ठप्प झाली. सुरुवातीला गुदमरत संथ गतीने रेल्वे वाहतूक सुरु होती. पण नंतर ती पूर्णपणे ठप्प झाली. दुपारी जवळपास 12 वाजेपासून मध्य रेल्वे, हार्बर रेल्वे वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली. यामुळे प्रवाशांची मोठी गैरसोय झाली.

हजारो रेल्वे प्रवासी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, दादर स्टेशन, कुर्ला, ठाणे यासर विविध रेल्वे स्थानकांवर लोकल ट्रेनची वाट पाहत उभे होते. अनेक तास उलटले तरी लोकल वाहतूक सुरु होत नव्हती. या दरम्यानच्या काळात अनेक प्रवाशांना प्रचंड मनस्तापाला सामोरं जावं लागलं. अनेक जण रेल्वे स्थानकांवर अडकून पडले. या दरम्यानच्या काळात काही स्थानकांवर टॉयलेटचीदेखील पुरेशी व्यवस्था नव्हती, अशी तक्रार काही प्रवाशांनी एका वृत्त वाहिनीला दिलेल्या मुलाखतीत केली. त्यामुळे प्रवासी किती भयानक परिस्थितीतून गेले असतील याची कुणी कल्पना देखील करु शकत नाही.

#### प्रवासी रेल्वे रुळावर पायी निघाले

लोकल ट्रेन सुरु होत नसल्याने अनेक ठिकाणी प्रवासी हे रेल्वे रुळावर उतरले आणि पायी चालत आपल्या घराच्या दिशेला मार्गक्रमण करायला लागले. या दरम्यान रेल्वे प्रशासनाने प्रवाशांच्या सुरक्षेच्या पार्श्वभूमीवर रेल्वे स्थानकावरच थांबण्याचं आवाहन केलं. रेल्वे रुळावर पाणी साचल्याने कुठेतरी खोल खड्डयात पडून अपघाताची घटना घडू नये यासाठी रेल्वे प्रवाशांकडून आवाहन केलं जात होतं. या दरम्यान संध्याकाळच्या सुमारास पाऊस थांबला होता. त्यामुळे रेल्वे गाड्या सुरु व्हाव्यात अशी प्रवाशांची मागणी होती. पण तरीही रेल्वे ट्रेन सुरु झाली नाही. यामुळे हतबल झालेल्या प्रवाशांनी रेल्वे रुळावर उतरुन मार्गक्रमण करायला सुरुवात केली. या काळात अनेक प्रवासी नाराज झालेले बघायला मिळाले. अनेकांचे नाराज चेहरे आणि डोळे त्यांच्या मनाच्या आतला कोलाहल सांगत होते. अखेर खूप प्रतिक्षेनंतर संध्याकाळी सात वाजेनंतर मुंबई लोकल धावायला सुरुवात झाली.

#### मेट्रो स्थानकाला गळती

मुसळधार पावसामुळे मुंबईची पूर्णपणे दाणादाण उडाली. अनेक ठिकाणी कंबरेइतकं पाणी साचलं. त्यामुळे रस्ते बंद झाले. अनेक ठिकाणी गाड्या पाणीखाली गेल्या. अनेक ठिकाणी सखल भागात पाणी शिरलं. मेट्रो 3 या भूमिगत मेट्रो मार्गावर बीकेसी मेट्रो स्थानकावर गळती होत असल्याचा प्रकार समोर आला. शेकडो कोट्यवधी रुपये खर्च करुन तयार करण्यात आलेल्या या भुयारी मेट्रो स्थानकात गळती होत असल्याचं निदर्शनास आल्याने अनेकांकडून आश्चर्य व्यक्त करण्यात आलं.

#### मोनोरेलही रखडली, नागरिकांचं रेस्क्यू ऑपरेशन

लोकल ट्रेन सात ते आठ तास बंद पडली. यानंतर मेट्रो स्थानकात गळती झाली. रस्ते पूर्णपणे पाण्याखाली गेले. यामुळे लाखो मुंबईकर त्रस्त झाले आणि तरीही मुंबईकरांची परीक्षा पूर्णपणे संपलेली नव्हती. कारण संध्याकाळच्या सुमारास मोनोरेलची घटना समोर आली. भक्तीपार्क ते म्हैसूर कॉलनी दरम्यान मोनोरेल एकाच ठिकाणी थांबली. यावेळी गाडीतील एसीदेखील बंद झाली. बराच वेळ झाला तरी गाडी चालू होत नाही म्हणून प्रवासी हतबल झाले. ही गाडी शेकडो प्रवाशांनी भरगच्च अशी भरली होती. प्रवाशांच्या जास्त वजनाने मोनोरेल अक्षरश: एका बाजूला झुकलेली बघायला मिळाली. पाऊण तास झाला तरी मोनोरेल चालू होत नाही म्हणून प्रवाशांना श्वास घेण्यास अडचण होऊ लागली. अनेक प्रवासी हे गाडीचे दरवाजे ठोकू लागले. आम्हाला बाहेर काढा म्हणून ओरडू लागले.

**उड्डाणपूल खुला** उद्घाटनाला मुहूर्त, मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते होणार

# विद्यापीठ चौकातील उड्डाणपूल आज खुला!

## ४५ मीटर पर्यंत रस्ता रुंदीकरण

। पुणे ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ चौकातील दुमजली उड्डाणपुलाचे लोकार्पण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आज, बुधवारी सायंकाळी सहा वाजता (२० ऑगस्ट) होणार आहे. त्यानंतर तातडीने उड्डाणपूल वाहतुकीसाठी खुला करण्यात येणार आहे. त्यामुळे विद्यापीठ चौक वाहतूक कोंडीमुक्त होणार आहे. दरम्यान, हा उड्डाणपूल तातडीने खुला करावा, अशी मागणी काँग्रेस आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने केली होती. उड्डाणपूल खुला न केल्यास आंदोलनाचा इशाराही देण्यात आला होता.**




विद्यापीठ चौकामध्ये, गणेशखिंड रस्त्यावरील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी दीर्घकालीन वाहतूक व्यवस्थानांतर्गत एकात्मिक उड्डाणपुलाची उभारणी करण्यात आली आहे. त्यासाठी २७७ कोटींचा खर्च झाला असून, पुणे विद्यापीठ ते भारतीय कृषी महाविद्यालय या अंतरामध्ये महापालिकेच्या विकास आराखड्यानुसार ४५ मीटर पर्यंत रस्ता रुंदीकरण करण्यात आले आहे. या उड्डाणपुलाचे स्वातंत्र्यदिनी लोकार्पण करण्याचे नियोजित होते. मात्र, काही अडचणींमुळे ते होऊ शकले नाही. वाहनचालकांची मोठ्या प्रमाणावर गैरसोय होत असल्याने उड्डाणपुलाची काम झालेली मार्गिका वाहतुकीसाठी तातडीने खुली करावी, अशी मागणी राजकीय पक्षांकडून करण्यात आली होती. राजकीय दबावानंतर उड्डाणपूल वाहतुकीसाठी खुला करण्यात येणार आहे.उड्डाणपुलाचे लोकार्पण झाल्यानंतर उड्डाणपुलाची एक मार्गिका (औंध-शिवाजीनगर) वाहतुकीसाठी खुली करण्यात येणार असल्याची माहिती पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून (पीएमआरडीए) देण्यात आली. शिवाजीनगर ते औंध बाजूकडील रॅम्पचे बांधकाम पूर्ण झाले असून, उर्वरित बाणेर आणि पाषाण बाजूकडील रॅम्पचे बांधकाम ऑक्टोबर महिन्याअखेरपर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात आल्याची माहिती 'पीएमआरडीए'चे महानगर आयुक्त डॉ. योगेश म्हसे यांनी दिली. उड्डाणपुलाच्या कामाला ऑगस्ट २०२२ मध्ये प्रारंभ करण्यात आला होता. त्यापूर्वी अस्तित्वातील दोन एकेरी वाहतुकीचे उड्डाणपूल ऑगस्ट २०२० मध्ये पाडण्यात आले होते.

विद्यापीठ चौकातील उड्डाणपुलाबरोबरच सिंहगड रस्त्यावरील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी उड्डाणपूल उभारण्यात आला आहे. या दोन्ही पुलांची उद्घाटने एकाच वेळी होणार असल्याचे जाहीर करण्यात आले होते. यापूर्वी सिंहगड रस्त्यावरील राजाराम पूल ते फन टाइम चित्रपटगृह दरम्यान राजाराम पूल चौकातील ५२० मीटर लांबीचा उड्डाणपूल आणि विठ्ठलवाडी कमान ते फन टाइम चित्रपटगृह हा २ हजार १२० मीटर लांबीचा उड्डाणपूल वाहतुकीसाठी यापूर्वीच खुला करण्यात आला आहे. तर, तिसऱ्या टप्प्यातील गोयल गंगा चौक ते इनामदार चौक हा १ हजार ५४० मीटर लांबीचा उड्डाणपूल अद्यापही वाहतुकीसाठी खुला झालेला नाही. या उड्डाणपुलाची सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक कामे अद्याप प्रलंबित आहेत. त्यामुळे उड्डाणपुलाचे काम रखडले असल्याची माहिती महापालिका प्रशासनाकडून देण्यात आली. विद्यापीठ चौकामध्ये, गणेशखिंड रस्त्यावरील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी दीर्घकालीन वाहतूक व्यवस्थानांतर्गत एकात्मिक उड्डाणपुलाची उभारणी करण्यात आली आहे. त्यासाठी २७७ कोटींचा खर्च झाला असून, पुणे विद्यापीठ ते भारतीय कृषी महाविद्यालय या अंतरामध्ये रस्ता रुंदीकरण करण्यात आले आहे. या उड्डाणपुलाचे स्वातंत्र्यदिनी लोकार्पण करण्याचे नियोजित होते. मात्र, काही अडचणींमुळे ते होऊ शकले नाही. वाहनचालकांची मोठ्या प्रमाणावर गैरसोय होत असल्याने उड्डाणपुलाची काम झालेली मार्गिका वाहतुकीसाठी तातडीने खुली करावी.

### औंधकडील रॅम्पचे बांधकाम पूर्ण

राजकीय दबावानंतर उड्डाणपूल वाहतुकीसाठी खुला करण्यात येणार आहे.उड्डाणपुलाचे लोकार्पण झाल्यानंतर उड्डाणपुलाची एक मार्गिका (औंध-शिवाजीनगर) वाहतुकीसाठी खुली करण्यात येणार असल्याची माहिती पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून (पीएमआरडीए) देण्यात आली. शिवाजीनगर ते औंध बाजूकडील रॅम्पचे बांधकाम पूर्ण झाले.

# विसर्जन मिरवणुकीबाबत आठवडाभरात निर्णय

## विसर्जन मिरवणूक यंदा सकाळी सात वाजता सुरू करण्याची मागणी

। पुणे ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**विसर्जन मिरवणुकीत काही मंडळांनी लवकर सहभागी होण्याचा निर्णय घेतला आहे. पोलिसांच्या दृष्टीने सर्व मंडळे सारखीच आहेत. उत्सव शांततेत आणि निर्विघ्नपणे पार पाडण्यासाठी प्रशासनाने तयारी केली आहे. पुण्यातील कार्यकर्ते सुज्ञ आहेत. मंडळाच्या कार्यकर्त्यांच्या सूचना विचारात घेऊन विसर्जन मिरवणुकीबाबत आठवडाभरात निर्णय घेण्यात येईल', अशी माहिती पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी मंगळवारी दिली.**



गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पुणे पोलिसांकडून मंगळवारी बालगंधर्व रंगमंदिरात बैठकीचे आयोजन करण्यात आले. या वेळी पोलीस आयुक्त अमितेशकुमार बोलत होते. जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, महापालिका आयुक्त नवलकिशोर राम, सहपोलीस आयुक्त रंजनकुमार शर्मा, अतिरिक्त पोलीस आयुक्त राजेश बनसोडे, मनोज पाटील, गुन्हे शाखेचे अतिरिक्त आयुक्त पंकज देशमुख यांच्यासह वरिष्ठ पोलीस अधिकारी या वेळी उपस्थित होते. अग्निशमन दल, महावितरण, तसेच विविध शासकीय विभागातील अधिकारी बैठकीस उपस्थित होते. या बैठकीत विविध प्रमुख मंडळांच्या ५०० पदाधिकारी उपस्थित होते. विसर्जन मिरवणूक यंदा सकाळी सात वाजता सुरू करण्याची मागणी काही मंडळांनी केली आहे. अखिल मंडई मंडळ, श्रीमंत भाऊसाहेब रंगारी मंडळाने यंदा विसर्जन मिरवणुकीत लवकर सहभागी होण्याचा निर्णय घेतला आहे. विसर्जन मिरवणुकीतील सहभागावरुन विविध मंडळांच्या कार्यकर्त्यांमध्ये मतभेद निर्माण झाले आहे. यापूर्वी पोलीस आयुक्तालयात मानाच्या मंडळांसह विविध मंडळांच्या पदाधिकाऱ्यांची बैठक आयोजित करण्यात आली होती.

### मंडळांचे कार्यकर्ते सुसंस्कृत

त्या वेळी पोलीस आयुक्त अमितेशकुमार यांनी विसर्जन मिरवणुकीबाबत समन्वयाने मार्ग काढू, असे जाहीर केले होते. त्याअनुषंगाने मंगळवारी झालेल्या बैठकीत पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी त्यांची भूमिका स्पष्ट केली.ते म्हणाले, 'पोलिसांच्या दृष्टीने सर्व मंडळे सारखीच आहेत. पुण्यातील गणेशोत्सवाला महत्त्व आहे. मंडळांचे कार्यकर्ते सुसंस्कृत आहे.

**रस्ते जलमय** पंधरा दिवसांच्या विश्रांतीनंतर पिंपरी चिंचवड शहरात

# पावसाच्या कोसळधारा!

## रस्ते जलमय ,वाहतूक संथ; जागोजागी वाहतूक कोंडी




। पुणे ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी: पिंपरी-चिंचवड शहरात मंगळवार दिवसभर पाऊस कोसळला. पंधरा दिवसांच्या विश्रांतीनंतर पावसाने हजेरी लावली. दिवसभर झालेल्या संततधारेमुळे पिंपरी-चिंचवडमधील रस्ते जलमय झाले होते. साचलेल्या पाण्यातून वाहनचालक, नागरिकांना वाट काढताना कसरत करावी लागली. गेल्या काही दिवसांपासून गायब झालेल्या पावसाने सोमवारी रात्री तर मंगळवारी दिवसभर पावसाची संततधार सुरु होती.**

शहरातील पिंपरी, चिंचवड, भोसरी, निगडी, आकुर्डी, पिंपळेगुरव, पिंपळेनिलख, सांगवी, वाकड, ताथवडे, पुनावळे या सर्वच भागात पाऊस झाला. शहरातील अनेक ठिकाणी सखल भागात पाणी साचले होते. पुणे-मुंबई महामार्गावर एका बाजुने महामेट्रो आणि दुसऱ्या बाजूने अर्बन स्ट्रीट, जलवाहिनीचे काम सुरू आहे. या कामामुळे ठिकठिकाणी खोदाई करण्यात आली आहे. त्यामुळे या मार्गावर मोठे खड्डेही पडले आहेत. निगडीतील टिळक चौक ते बजाज ऑटोपर्यंतच्या मार्गावर पाणी साचले होते. यातून वाहन चालविताना चालकांना मोठी कसरत करावी लागली. यामुळे वाहतूक संथ होऊन कोंडी झाली होती.



### काळेवाडीत गाड्यांच्या रांगा

काळेवाडी व रहाटणी फाटा येथे सकाळी सिग्नल बंद असल्याने वाहतूक कोंडी झाली त्यामुळे गाड्यांचा मोठ्या रांगा लागल्या या वाहतूक कोंडीत बस अडकल्याने चाकरमानी कर्मचारी खूप हाल झाले तर बसच्या वेळापत्रकावर परिणाम झाला

### साचलेल्या पाण्याचा तातडीने निचरा करण्यात आला - ओमप्रकाश बहिवाल

शहरात मध्यम स्वरुपाचा पाऊस झाला. कोठेही घरात पाणी शिरले नाही. सखल भागात साचलेल्या पाण्याचा तातडीने निचरा करण्यात आल्याचे महापालिकेचे आपत्ती व्यवस्थापन अधिकारी ओमप्रकाश बहिवाल यांनी सांगितले

### वर्षभराची पाण्याची चिंता मिटली

पिंपरी-चिंचवड शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या मावळातील पवना धरण परिसरात पावसाचा जोर वाढला आहे. त्यामुळे धरणातील पाणीसाठा ९९ टक्क्यांवर पोहोचला आहे. शहरवासीयांची वर्षभराची पाण्याची चिंता मिटली आहे.

### धरणातून विसर्ग, प्रशासन सतर्क

धरण पाणलोट क्षेत्रात पावसाचा जोर वाढल्याने धरणातून ८०० क्युसेकने पाण्याचा पवना नदीत विसर्ग करण्यात आल्याचे शाखा अभियंता रजनीश बरिया यांनी सांगितले. धरणातून येणारे पाणी, शहरात पडणाऱ्या पावसामुळे पवना, इंद्रायणी आणि मुळा नदीच्या पाणी पातळीत वाढ झाली. या पार्श्वभूमीवर महापालिका आयुक्त शेखर सिंह यांनी आपत्कालीन यंत्रणेला सतर्क राहण्याचे आदेश दिले. नदीकाठी राहणाऱ्या नागरिकांनी सतर्क रहावे, असे आवाहनही त्यांनी केले

## लोणावळ्यासह मावळाला मुसळधार पावसाने झोडपले

मागील तीन दिवसांपासून लोणावळ्यासह मावळात पावसाने दमदार हजेरी लावली. लोणावळ्यात मागील २४ तासांत १४२ तर मंगळवारी दिवसभरात आठ तासांत विक्रमी १५० मिलिमीटर पावसाची नोंद झाली. पवना धरण पाणलोट क्षेत्रात मागील २४ तासांत ५५ तर मंगळवारी दिवसभरात ६५ मिलिमीटर पावसाची नोंद झाली आहे. पवना धरण शंभर टक्के भरल्याने पिंपरी चिंचवडसह मावळातील पिण्याच्या पाण्याची व शेतीच्या सिंचनाची चिंता मिटली असुन, सायंकाळी सहा वाजता धरणातून 16 हजार क्युसेक इतका पाण्याचा विसर्ग पवना नदीच्या पात्रात सोडण्यात आला आहे. यामुळे पवना नदीवरील कोथुर्णे पुल पाण्याखाली गेल्याने परिसरातील गावांचा संपर्क तुटला आहे. मंगळवारी लोणावळ्यात दिवसभरातील संततधार व मुसळधार पावसामुळे टायगर व लायन्स पॉईंट्सकडे जाणाऱ्या भुशी रोडवर मोठ्या प्रमाणात पाण्याचा प्रवाह वाहू लागल्यामुळे या रोडवरील वाहतूक काही काळ विस्कळीत झाली होती. तर भुशी धरणाच्या पायऱ्यांवरून मोठ्या प्रमाणात पाण्याचा प्रवाह वाहू लागल्यामुळे पर्यटकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने लोणावळा शहर पोलिसांनी भुशी धरणावर जाण्यास प्रतिबंध केला होता. तसेच लोणावळा शहर व परिसरासह मावळातील अनेक ठिकाणच्या सोसायटी, बंगले, दुकाने आणि घरात पाणी शिरल्याने नागरिकांचे नुकसान झाले आहे.पावसाच्या पुनरागमनामुळे मावळातील पवना, लोणावळा, भुशी, वलवण, तुंगार्ली, शिरोता, आंद्रा, वडिवळे (उकसान), जाधववाडी, ठोकळवाडी, मळवंडीठुले, आढले व कासारसाई या धरणाच्या पाण्याच्या पातळीत कमालीची वाढ झाली आहे. यामध्ये पवना, आंद्रा, भुशी, आंद्रा, वडिवळे, मळवंडीठुले, आढले, कासारसाई, जाधववाडी हि धरणे पूर्ण क्षमतेने भरली आहे.

# प्रीपेड स्मार्ट मीटरचा वाद




**केंद्र सरकारच्या आरडीएसएस या वीजपुरवठा पायाभूत सुविधा विकास कार्यक्रमांतर्गत राज्यात स्मार्ट मीटर बसविण्याची योजना आहे. स्मार्टमीटर ग्राहकांना मोफतच मिळणार आहे, परंतु प्रीपेड स्मार्ट मीटरच्या विरोधात मोहीम सुरू झाली आहे.**

अत्याधुनिक डिजिटल तंत्रज्ञान वापरून वीज वापराबाबत अचूक आणि पारदर्शी नोंदींची व्यवस्था महावितरण सरकारी कार्यालये आणि स्वतःपासून उपलब्ध करून देत आहे. सध्या प्रीपेड स्मार्ट मीटर भारतात आसाम, बिहार, मध्यप्रदेश,जम्मू काश्मीर आदी राज्यात वापरले जात आहे. त्यासाठी केंद्राकडून आर्थिक मदत देण्यात येत आहे. स्मार्टमीटर ग्राहकांना मोफतच मिळणार आहे. त्यांना त्यासाठी प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्षरीत्या कोणत्याही प्रकारे शुल्क आकारले जाणार नाही, हे आधीच स्पष्ट करण्यात आले आहे. स्मार्ट मीटरमध्ये ग्राहकांचा वीजवापर मोजला जाईल आणि दूरवर असलेल्या सर्व्हरमध्ये त्याची आपोआप नोंद होईल. आपल्या मोबाइलचा वापर हा सेवा देणाऱ्या कंपनीकडे आपोआप नोंदविला जातो. वीज ग्राहकांना त्यांचा वीजवापर दर मिनिटाला त्याच्या मोबाईल फोनवर जाणून घेता येणार आहे. अत्यंत अचूक व पारदर्शीपणे रिडिंग हे स्मार्ट मीटरचे खास वैशिष्ट्य आहे. त्याच्या वापरामुळे वीज ग्राहकांच्या मीटरचे रिडिंग चुकीचे



घेतले, रिडिंग नियमितपणे घेतले नाही, अचानक जास्त वीज वापराचे वीज बिल आले, इतका वीज वापर झाला आणि मला समजलेच नाही अशा बिलिंगबाबतच्या समस्या पूर्णपणे संपुष्टात येणार आहेत. वीज कंपनीला प्रत्येक ग्राहकाच्या विजेच्या वापराची अचूक नोंद झाल्यामुळे वीज बिल वसुली आणि वीजपुरवठ्याचे व्यवस्थापन यामध्ये क्रांतिकारी सुधारणा करता येणार आहेत. विजेचे दर ठरविण्याचा अधिकार 'महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगा'ला असतो. त्यामुळे हे दर महावितरण ठरवू शकत नसल्यामुळे स्मार्ट मीटर लावल्यानंतरही विजेचे दर आहेत तेवढेच राहणार आहेत. परिणामी स्मार्ट मीटरमुळे वीज महाग होईल, ६ हजार १३६रूपये किंमत असलेला स्मार्ट मीटर १२ हजार रूपयांना घेतला गेला आहे या अपप्रचाराला काहीही अर्थ नाही. मीटर बसवून देणाऱ्या खासगी एजन्सीला दहा वर्षे मीटरची देखभाल दुरूस्ती करणे, निर्मितीच्या दोषामुळे मीटरमध्ये बिघाड झाल्यास ते मोफत बदलणे, रिडिंग उपलब्ध करून देणे इत्यादी जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागणार आहेत आणि त्यासाठी एजन्सीला वेगळा मोबदला दिला जाणार आहे. स्मार्टमीटर बसविण्यासाठी महावितरण कडून १६ हजार कोटी रूपयांचे कर्ज घेण्यात येणार आहे व त्याचा बोझा ग्राहकांवर पडून वीजदरवाढ होईल अशीही अफवा पसरविण्यात आली आहे. मात्र वस्तुस्थिती अशी आहे की, स्मार्ट मीटरसाठीचे पैसे संबंधित कंपन्यांना दहा वर्षात टप्प्याटप्प्याने द्यायचे आहेत व जेवढे मीटर बसतील तेवढ्या मीटर्सचेच पैसे द्यायचे आहेत. स्मार्ट मीटरसाठी द्यावे लागणारे पैसे महावितरणला आपल्या स्वतःच्या महसुलातून देता येतील व त्यासाठी स्वतंत्र कर्ज काढावे लागणार नाही. वाणिज्यिक हानी कमी झाल्याने आणि रिटर्न ऑन इक्विटी सुधारल्याने महावितरणला परतफेड करणे सोपे जाणार आहे. स्मार्ट मीटरमुळे वीज क्षेत्राचे खासगीकरण होईल, हा अपप्रचार आहे. महावितरण ही राज्य सरकारच्या मालकीची कंपनी आहे. ही मालकी कोण्या खासगी कंपनीला हस्तांतरित करण्याचा राज्य सरकारचा कोणताही विचार नाही. वीज ग्राहकांसाठी बसविण्यात येणारे विजेचे स्मार्ट मीटर हे अचूक बिलिंग,वीजवापराची नियमित माहिती व खर्चावर नियंत्रण ठेवण्याची सुविधा यामुळे वरदान ठरणार आहेत. स्मार्ट मीटरच्या वापरामुळे भविष्यात वीजवापराच्या वेळेनुसार कमी दरात वीज मिळण्याची सुविधाही उपलब्ध करता येणार आहे. अत्याधुनिक डिजिटल तंत्रज्ञान वापरून वीज वापराबाबत अचूक आणि पारदर्शी नोंदींची व्यवस्था महावितरण सरकारी कार्यालये आणि स्वतःपासून उपलब्ध करून देत आहे. सध्या प्रीपेड स्मार्ट मीटर भारतात आसाम, बिहार, मध्यप्रदेश,जम्मू काश्मीर आदी राज्यात वापरले जात आहे. त्यासाठी केंद्राकडून आर्थिक मदत देण्यात येत आहे. स्मार्टमीटर ग्राहकांना मोफतच मिळणार आहे. त्यांना त्यासाठी प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्षरीत्या कोणत्याही प्रकारे शुल्क आकारले जाणार नाही.

## प्रासंगिक »

### विकासाचा चिखल

***हवामान बदल हा शहरी, निमशहरी नागरिकांसाठी केवळ गैरसोय असेल पण शेतीवर आधारित लाखोंसाठी हा पर्यावरणीय बदल आयुष्य उद्ध्वस्त करणारा आहे...***

साधारण २२ वर्षांपूर्वी युरोपास उष्णतेच्या लाटेने होरपळून काढले. सर्वकाल सुखद हवामानात राहावयाची सवय लागलेल्या युरोपियनांना अंग भाजून काढणारे ऊन ठाऊक नव्हते. त्यात तो खंड एकीकडे उत्तर ध्रुव ते दुसरीकडे आफ्रिकेपासून जवळचा भूमध्य समुद्र असा पसरलेला. त्यामुळे तेथील उन्हातून अतिनील किरणांचा मारा अधिक भेदक आणि म्हणून अधिक धोकादायक. त्वचेच्या कर्करोगाचे सर्वाधिक रुग्ण त्या परिसरात आढळतात ते याचमुळे. तेव्हा जरा जरी ऊन आले की त्वचेची काळजी घेणारी मलमे, द्राव यांचा वापर केल्याखेरीज तेथे तरणोपाय नाही. सत्ताधीशांस आगामी संकटाची चाहूल लागली. तोवर 'ग्लोबल वॉर्मिंग'- वसुंधरेचे तापणे- हे केवळ चर्चा-परिसंवादापुरते मर्यादित होते आणि ते किती आपल्या अंगणापर्यंत आलेले आहे याची जाणीव नव्हती.

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प स्वत:ला 'डीलमेकर' म्हणवतात आणि अनेक आंतरराष्ट्रीय संघर्ष थांबवण्याची क्षमता आपल्याइतकी कोणत्याच नेत्यामध्ये नाही याविषयी त्यांना खात्री वाटते. पण ते ज्या संघर्षामध्ये मध्यस्थीसाठी उडी घेतात तो थांबवू शकत नाहीत

# मध्यस्थीचा निव्वळ झगमगाटच?

इस्रायल-इराण संघर्ष थांबवल्याचे श्रेय त्यांना सशर्त देता येऊ शकेल, कारण इराणवर बॉम्बफेक करून त्यांनी त्या देशाला संघर्ष थांबवायला भाग पाडले. पण ती खेळी मध्यस्थीच्या कसोटीवर पात्र ठरत नाही असे सांगणारेही आढळतील.गेलाबाजार अझरबैजान-आर्मेनिया आणि कुण्या दोन आफ्रिकी देशांमध्ये तह घडवून आणण्यात ते यशस्वी झाले, ज्याची दखल जगाने फारशी घेतली नाही. रशिया-युक्रेन संघर्ष थांबवण्याची ट्रम्प यांची फार दिवसांची इच्छा आहे. खरे तर गेल्या सहा महिन्यांत दोन्ही देशांच्या राष्ट्रप्रमुखांविषयी त्यांनी समक्ष आणि परोक्ष कठोर विधाने केलेली होती. तरीदेखील अमेरिकेची निर्विवाद लष्करी, आर्थिक ताकद पाहता ट्रम्प यांच्या मध्यस्थीचा पुढाकार स्वीकारण्यावाचून रशियाचे अध्यक्ष व्लादिमिर पुतिन आणि युक्रेनचे अध्यक्ष वोलोदिमिर झेलेन्स्की यांच्यासमोर पर्याय नव्हताच. अलास्कामध्ये १५ ऑगस्ट रोजी ट्रम्प व पुतिन यांच्यात आणि वॉशिंग्टनमध्ये १८



ऑगस्ट रोजी ट्रम्प व झेलेन्स्की यांच्यात झालेल्या बैठका ट्रम्प यांची प्रतिमा उजळण्यासाठी महत्त्वाच्या असतीलही. पण त्या किती निर्णायक किंवा निष्फळ ठरतात हे येत्या काही दिवसांत स्पष्ट होईल. ट्रम्प यांना झेलेन्स्की-पुतिन यांच्यात थेट चर्चा घडवून आणायची आहे आणि नंतरच्या टप्प्यात या दोघांसह ते स्वत: अशी त्रिपक्षीय चर्चाही प्रस्तावित आहे. पुतिन यांना ट्रम्प यांच्याकडून मिळालेली वागणूक पाहिल्यावर त्यांचा कल रशियाच्या दिशेनेच झुकला असे पुन्हा वाटू लागले होते. कारण त्या भेटीत शाश्वत शांततेसाठी 'युद्धविराम' पहिल्या पायरीविषयी कोणतीही प्रगती दिसून आली नाही. ट्रम्प हे तर त्याची गरज नसल्याचेच सांगू लागले होते. त्या भेटीदरम्यान ट्रम्प यांनी 'प्रदेशांची अदलाबदल' असा शब्दप्रयोग केला, तो झेलेन्स्की यांना धोकादायक वाटला असावा. कारण सध्या रशियाकडे युक्रेनच्या डोनबास प्रदेशातील दोन प्रांतांचा बहुतेक ताबा आणि इतर दोन प्रांतांचा अंशत: ताबा आहे. त्यांची वाटणी ट्रम्प-पुतिन यांनी परस्पर ठरवली, तर झेलेन्स्की यांची मोठीच पंचाईत झाली असती.यासाठीच झेलेन्स्कीही ट्रम्प यांना समक्ष भेटले. फेब्रुवारीत या दोन नेत्यांमध्ये झालेल्या स्फोटक भेटीच्या तुलनेत परवाची भेट खूपच सौहार्दपूर्ण झाली. त्यात झेलेन्स्की यांच्या पेहरावाविषयी बरेच काही छापून आले असले, तरी त्यांना त्याच वेळी तेथे आवर्जून गेलेल्या सात युरोपीय नेत्यांचे बळ मिळाले हेयुरोपीय लवाजमा ट्रम्प यांनी स्वागतपात्र मानला हा त्यांचा दुर्मीळ मोठेपणा. युक्रेन-रशिया शांतता चर्चेमध्ये अमेरिका हा महत्त्वाचा घटक ठरू लागला असला, तरी युरोपातील प्रमुख देशांना बाजूला ठेवून ही चर्चा होऊ शकत नाही, हे यावेळी दिसून आले.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

## एकसंध विचारधारा

## ज्येष्ठ स्वयंसेवक अरुण भणगे यांचा सन्मान

# देशात दोन विचारधारा चालणार नाहीत!

## खराब पद्धतीने सण साजरे केले जातात



।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**एका देशामध्ये दोन विचारधारा चालणार नाहीत. यामुळेच देश व राज्यामध्ये राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या विचारांचे सरकार सत्तेवर आहे. देशात सलग तिसऱ्यांदा संघ विचारांचे सरकार सत्तेवर आले, हा देशामध्ये खूप मोठा बदल आहे, असे प्रतिपादन विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी कर्जत येथे बोलताना केले.**

येथील ज्येष्ठ स्वयंसेवक अरुण भणगे यांना दीपस्तंभ पुरस्कार प्रदान व अभीष्टचिंतन सोहळ्यात सभापती शिंदे बोलत होते. या वेळी त्र्यंबकेश्वर येथील संतश्रेष्ठ निवृत्तिनाथ महाराज पालखी सोहळ्याचे प्रमुख व विश्वस्त हभप नवनाथ महाराज गांगुर्डे, विद्याभारती शिशुवाटिका विभागाचे प्रमुख सदाशिव उपाले, रा. स्व. संघाचे पश्चिम महाराष्ट्राचे प्रांत संचालक नानासाहेब जाधव, जिल्हा संघचालक वाल्मीक कुलकर्णी, सेवा भारती विभागाचे सचिव प्रदीप सबनीस, उद्योजक भाऊसाहेब जंजिरे यांच्यासह राजकीय, सामाजिक, शैक्षणिक व्यापारी क्षेत्रातील मान्यवरांसह रा. स्व. संघाचे पदाधिकारी उपस्थित होते.राम शिंदे म्हणाले, की संघ स्वयंसेवक होणे पूर्वी अस्पृश्य मानले जात होते; मात्र आज संघ स्वयंसेवक असल्यावर त्याच्याकडे आदरपूर्वक पाहिले जाते, हा बदल देशामध्ये झाला आहे. संघाला १०० वर्षे पूर्ण होत आहेत. त्या निमित्ताने देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वातंत्र्य दिनाचे भाषण लाल किल्ल्यावरून करताना संघाच्या शंभर वर्षांच्या वाटचालीचा इतिहास सांगितला. अरुणकाका भणगे यांच्यासारख्या देशातील लाखो स्वयंसेवकामुळे या देशात एकाच विचारधारेचे सरकार देशामध्ये सलग तिसऱ्यांदा सत्तेवर आले आहे आणि राज्यामध्ये संघाच्या विचाराचे सरकार सत्तेवर असून, विरोधक आपल्याकडे येण्यासाठी आजही मोठ्या संख्येने रांगेत उभे आहेत. हा मोठा बदल झाल्याचे दिसते.सदाशिव उपाले यांनी आजची कुटुंब व्यवस्था, संस्कार आणि सद्य:स्थिती यावर परखड मनोगत व्यक्त केले. हभप नवनाथ गांगुर्डे यांनी, देशामध्ये सण-उत्सव साजरे करताना हिंदू धर्म संस्कृती बिघडत चालली आहे. खराब पद्धतीने सण-उत्सव साजरे केले जातात, अशी टीका केली.

नानासाहेब जाधव यांचेही भाषण झाले. प्रास्ताविक गजानन चावरे यांनी केले, तर उदय भणगे यांनी आभार मानले.येथील ज्येष्ठ स्वयंसेवक अरुण भणगे यांना दीपस्तंभ

## धर्म संस्कृती बिघडत चालली

हभप नवनाथ गांगुर्डे यांनी, देशामध्ये सण-उत्सव साजरे करताना हिंदू धर्म संस्कृती बिघडत चालली आहे. खराब पद्धतीने सण-उत्सव साजरे केले जातात, अशी टीका केली. नानासाहेब जाधव यांचेही भाषण झाले. एका देशामध्ये दोन विचारधारा चालणार नाहीत. यामुळेच देश व राज्यामध्ये राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या विचारांचे सरकार सत्तेवर आहे.

पुरस्कार प्रदान व अभीष्टचिंतन सोहळ्यात सभापती शिंदे बोलत होते. या वेळी त्र्यंबकेश्वर येथील संतश्रेष्ठ निवृत्तिनाथ महाराज पालखी सोहळ्याचे प्रमुख व विश्वस्त हभप नवनाथ महाराज गांगुर्डे, विद्याभारती शिशुवाटिका विभागाचे प्रमुख सदाशिव उपाले, रा. स्व. संघाचे पश्चिम महाराष्ट्राचे प्रांत संचालक नानासाहेब जाधव, जिल्हा संघचालक वाल्मीक कुलकर्णी, सेवा भारती विभागाचे सचिव प्रदीप सबनीस, उद्योजक भाऊसाहेब जंजिरे यांच्यासह राजकीय, सामाजिक, शैक्षणिक व्यापारी क्षेत्रातील मान्यवरांसह रा. स्व. संघाचे पदाधिकारी उपस्थित होते.राम शिंदे म्हणाले, की संघ स्वयंसेवक होणे पूर्वी अस्पृश्य मानले जात होते; मात्र आज संघ स्वयंसेवक असल्यावर त्याच्याकडे आदरपूर्वक पाहिले जाते, हा बदल देशामध्ये झाला आहे.

संघाला १०० वर्षे पूर्ण होत आहेत. त्या निमित्ताने देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वातंत्र्य दिनाचे भाषण लाल किल्ल्यावरून करताना संघाच्या शंभर वर्षांच्या वाटचालीचा इतिहास सांगितला. या देशात एकाच विचारधारेचे सरकार देशामध्ये सलग तिसऱ्यांदा सत्तेवर आले आहे आणि राज्यामध्ये संघाच्या विचाराचे सरकार सत्तेवर असून, विरोधक आपल्याकडे येण्यासाठी आजही मोठ्या संख्येने रांगेत उभे आहेत. हा मोठा बदल झाल्याचे दिसते.सदाशिव उपाले यांनी आजची कुटुंब व्यवस्था, संस्कार आणि सद्य:स्थिती यावर परखड मनोगत व्यक्त केले.

# राज्यात मुसळधार पावसाची स्थिती गंभीर

## उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा आपत्ती व्यवस्थापन कक्षातून आढावा



।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**राज्यभरात मुसळधार पावसामुळे निर्माण झालेल्या पूरस्थितीच्या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज मंत्रालयातील राज्य आपत्ती व्यवस्थापन कक्ष येथे परिस्थितीचा आढावा घेतला. नागरिकांनी अफवांवर विश्वास न ठेवता, घाबरून न जाता खबरदारी घ्यावी, असे आवाहन यावेळी उपमुख्यमंत्री पवार यांनी केले. "राज्य सरकार आणि यंत्रणा पूर्ण क्षमतेने कार्यरत असून, आवश्यक ती सर्व मदत करण्यात येईल," असेही त्यांनी स्पष्ट केले.**

राज्यात मुंबई, ठाणे, रायगड, रत्नागिरी आणि पालघर जिल्ह्यांसह घाटमाथ्यावरील भागांमध्ये रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे. हवामान विभागाच्या सूचना लक्षात घेऊन आपत्ती व्यवस्थापन विभागाकडून दर तीन तासांनी अहवाल सादर केला जात आहे.राज्यातील 10 लाख एकर शेती पूराच्या पाण्याखाली गेली असून, यामुळे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. धरणांवरील जलसाठ्यावर सतत लक्ष ठेवण्यात येत असून, धोका असलेल्या नदीकाठच्या

## अत्याधुनिक यंत्रणेचा उपयोग

आपत्ती व्यवस्थापन कक्षामध्ये अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने हवामान, वाऱ्याची दिशा, पावसाचे प्रमाण आदींचा मागोवा घेतला जात आहे. दर तीन तासांनी नकाशा व माहिती अद्ययावत करून निर्णय प्रक्रियेस गती दिली जात आहे. या आढावामुख्य सचिव राजेश कुमार, आपत्ती व्यवस्थापन विभागाच्या अपर मुख्य सचिव सोनिया सेठी, तसेच इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

गावांना सतर्कतेचे संदेश पाठवले जात आहेत. नागरिकांचे सुरक्षित स्थळी स्थलांतर सुरू आहे.नांदेड जिल्ह्यातील पाण्याची पातळी वाढल्याने एनडीआरएफ आणि एसडीआरएफ पथकांना तैनात करण्यात आले आहे. अडकलेल्या नागरिकांना सुरक्षित ठिकाणी हलविण्याचे काम युद्धपातळीवर सुरू असून, वैद्यकीय मदत आणि अन्नपुरवठ्याचीही व्यवस्था करण्यात आली आहे. जिल्हाधिकाऱ्यांशी सतत संपर्क साधून परिस्थितीवर लक्ष ठेवले जात आहे. शेतकऱ्यांच्या नुकसानीसंदर्भात पाऊस ओसरल्यानंतर तातडीने पंचनामे करण्याच्या सूचना देण्यात आल्या

**गेमिंगवर बंदी**

## केंद्र सरकार मोठा निर्णय घेण्याच्या तयारीत

# ऑनलाइन गेमिंगवर येणार बंदी?

## लवकरच विधेयक सादर होणार

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**भारतात ऑनलाइन गेमिंगची क्रेझ मोठ्या प्रमाणात आहे. लहान मुलांपासून ते तरुणांपर्यंत अगदी सर्वांमध्ये ऑनलाइन गेमिंगची क्रेझ असल्याचं दिसून येतं. मात्र, देशात वेगाने वाढणाऱ्या या ऑनलाइन गेमिंग क्षेत्राला आळा घालण्यासाठी आता केंद्र सरकार मोठं पाऊल उचलण्याच्या तयारीत आहे. केंद्रीय मंत्रिमंडळाने मंगळवारी ऑनलाइन गेमिंग संदर्भातील एका विधेयकाला मंजुरी दिली आहे.**



केंद्रीय मंत्रिमंडळाने मंजुरी दिलेल्या ऑनलाइन गेमिंग विधेयकाचा उद्देश हा डिजिटल गेमिंग संदर्भातील नियमन करणे आणि पैशाशी संबंधित सर्व गेमिंग व्यवहार पूर्णपणे बंद करणे हा असल्याचं सांगितलं जात आहे. सरकारच्या म्हणण्यांनुसार, या विधेयकाच्या अंमलबजावणीनंतर सर्व गेमिंग व्यवहार पूर्णपणे बंद होतील. या संदर्भातील वृत्त सूत्राच्या हवाल्याने इंडिया टुडेने दिलं आहे.दरम्यान, ऑनलाइन गेमिंग संदर्भातील हे विधेयक बुधवारी लोकसभेत मांडलं जाण्याची शक्यता आहे. गेल्या काही महिन्यांत फसवणुकीच्या घटना मोठ्या प्रमाणात वाढल्या आहेत. त्यामुळे या घटनांना आळा घालण्यासाठी आता केंद्र सरकार संसदेत विधेयक आणण्याच्या तयारीत आहे. माहितीनुसार, हे विधेयक लागू झाल्यास सर्व पैशांवरील आधारित गेमिंग व्यवहारांवर बंदी येण्याची शक्यता आहे.तसेच या विधेयकाच्या अंमलबजावणीनंतर ऑनलाइन गेमिंगच्या प्रस्तावित नियमन आणि कायद्याअंतर्गत बँका आणि वित्तीय संस्थांना रिअल-मनी ऑनलाइन गेमिंगसाठी निधी प्रक्रिया किंवा हस्तांतरण करण्याची परवानगी दिली जाणार नाही. तसेच रिअल-मनी गेमिंगला प्रोत्साहन देणाऱ्या जाहिरातींवर आणि अशा प्रकारच्या ऑनलाइन गेमिंगचा सतत प्रचार करण्यावर आणि बेकायदेशीर गेमिंग प्लॅटफॉर्मवर कठोर कारवाई करण्यात येईल. दरम्यान, ऑक्टोबर २०२३ मध्ये सरकारने अशा प्लॅटफॉर्मवर २८ टक्के जीएसटी लादला होता. तसेच आर्थिक वर्ष २५ पासून ऑनलाइन गेममधून मिळवलेल्या विजयावर ३० टक्के कर आकारला जातो. तसेच केंद्र सरकारने २०२२ ते फेब्रुवारी २०२५ दरम्यान जुगारात सहभागी असलेल्या १,४०० हून अधिक वेबसाइट्स आणि ॲप्सवर याआधीच कारवाई केलेली आहे.केंद्रीय मंत्रिमंडळाने मंजुरी दिलेल्या ऑनलाइन गेमिंग विधेयकाचा उद्देश हा डिजिटल गेमिंग संदर्भातील नियमन करणे आणि पैशाशी संबंधित सर्व गेमिंग व्यवहार पूर्णपणे बंद करणे हा असल्याचं सांगितलं जात आहे. सरकारच्या म्हणण्यांनुसार, या विधेयकाच्या अंमलबजावणीनंतर सर्व गेमिंग व्यवहार पूर्णपणे बंद होतील. या संदर्भातील वृत्त सूत्राच्या हवाल्याने इंडिया टुडेने दिलं आहे.दरम्यान, ऑनलाइन गेमिंग संदर्भातील हे विधेयक बुधवारी लोकसभेत मांडलं जाण्याची शक्यता आहे. गेल्या काही महिन्यांत फसवणुकीच्या घटना मोठ्या प्रमाणात वाढल्या आहेत. त्यामुळे या घटनांना आळा घालण्यासाठी आता केंद्र सरकार संसदेत विधेयक आणण्याच्या तयारीत आहे. माहितीनुसार, हे विधेयक लागू झाल्यास सर्व पैशांवरील आधारित गेमिंग व्यवहारांवर बंदी येण्याची शक्यता आहे.तसेच या विधेयकाच्या अंमलबजावणीनंतर ऑनलाइन गेमिंगच्या प्रस्तावित नियमन आणि कायद्याअंतर्गत बँका आणि वित्तीय संस्थांना रिअल-मनी ऑनलाइन गेमिंगसाठी निधी प्रक्रिया किंवा हस्तांतरण करण्याची परवानगी दिली जाणार नाहीदरम्यान, ऑक्टोबर २०२३ मध्ये सरकारने अशा प्लॅटफॉर्मवर २८ टक्के जीएसटी लादला होता. तसेच आर्थिक वर्ष २५ पासून ऑनलाइन गेममधून मिळवलेल्या विजयावर ३० टक्के कर आकारला जातो. तसेच केंद्र सरकारने २०२२ ते फेब्रुवारी २०२५ दरम्यान जुगारात सहभागी असलेल्या १,४०० हून अधिक वेबसाइट्स आणि ॲप्सवर याआधीच कारवाई केलेली आहे.

### सर्व गेमिंग व्यवहार पूर्णपणे बंद

केंद्रीय मंत्रिमंडळाने मंजुरी दिलेल्या ऑनलाइन गेमिंग विधेयकाचा उद्देश हा डिजिटल गेमिंग संदर्भातील नियमन करणे आणि पैशाशी संबंधित सर्व गेमिंग व्यवहार पूर्णपणे बंद करणे हा असल्याचं सांगितलं जात आहे. सरकारच्या म्हणण्यांनुसार, या विधेयकाच्या अंमलबजावणीनंतर सर्व गेमिंग व्यवहार पूर्णपणे बंद होतील. या संदर्भातील वृत्त सूत्राच्या हवाल्याने इंडिया टुडेने दिलं आहे.

# बिहारमध्ये एकतर्फी मतचोरीला आळा?

## एसआयआर मोहिमेनंतर 65 लाख मतदारांना वगळण्यात आले

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**बिहारमध्ये काँग्रेसचे नेते राहुल गांधींच्या ‘व्होटर अधिकार यात्रे’मुळे एकतर्फी मतचोरीला आळा बसेल असा सूर उमटू लागला आहे. ही यात्रा काढली नसती तर मतदानाचा हक्क पुन्हा बहाल करण्याची प्रक्रिया पूर्णपणे भाजपच्या बाजूने झाली असती. त्याचा मोठा फटका काँग्रेस आघाडीला मतदानाआधीच बसला असता, असा दुजोरा बिहारमधील काँग्रेसचे वरिष्ठ नेत्याने दिला.**



बिहारमध्ये मतदारयाद्यांच्या विशेष सखोल फेरतपासणी (एसआयआर) मोहिमेनंतर ६५ लाख मतदारांना वगळण्यात आले आहे. मात्र, त्यावर हरकत घेण्याची मुदत केंद्रीय निवडणूक आयोगाने दिली आहे. शिवाय, आधारकार्डही ग्राह्य धरले जाणार असल्याने काही लाख मतदारांना मतदानाचा हक्क पुन्हा मिळू शकतो. हे लाखो मतदार कोणाचा फायदा करून देणार यावर बिहारमधील विधानसभा निवडणुकीचे गणित अवलंबून असेल, असे मानले जात आहे. “काँग्रेसच्या यात्रेमुळे केंद्रीय निवडणूक आयोगावर दबाव वाढू लागला आहे. आता यात्रेमुळे काँग्रेस आघाडीची संभाव्य ‘मते’ आम्हाला वाचवता येऊ शकतील,” असा दावा बिहारमधील माजी मंत्र्याने केला.पण, काँग्रेस ही संभाव्य ‘मते’ वाचवण्यात किती यशस्वी होईल, या प्रश्नावर काँग्रेसच्या चार दशके आमदार असलेल्या नेत्याने, “काँग्रेसच्या नेत्यांचा यात्रेमध्ये मौल्यवान वेळ वाया जात आहे”, अशी कबुली दिली. ब्लॉक स्तरावरील निवडणूक अधिकारी लोकांचे ऐकण्याची शक्यता नाही. काँग्रेसचे नेत्यांनाच प्रत्यक्ष हजर राहून ब्लॉक स्तरावर वगळलेल्या मतदारांची शहानिशा करावी लागेल. तरच, निवडणूक अधिकाऱ्यावर दबाव येईल.

### तर बिहारचे ‘दिल्ली’ होईल!

आणि मतदानाचा हक्क बहाल होईल. त्यासाठी काँग्रेसला नेत्यांना, कार्यकर्त्यांना सक्रिय करावे लागेल, असा मुद्दा या नेत्याने मांडला.गेल्या विधानसभा निवडणुकीमध्ये भाजपच्या राष्ट्रीय लोकशाही आघाडीला (रालोआ) काँग्रेस-राष्ट्रीय जनता दल व डाव्यांच्या महागठबंधन आघाडीपेक्षा केवळ १२,७०० मते जास्त मिळाली होती.

# नाकात नथ अन्..; 'कमळी'चा नवीन लूक पाहिलात का?

'कमळी' मालिकेत सध्या कामिनीने अन्नपूर्णा आजीसमोर प्रॉपर्टी संदर्भात मोठी अट ठेवल्याचं पाहायला मिळत आहे. जर सहा महिन्यात महाजनांची मोठी नात घरात नाही आली तर, सगळी प्रॉपर्टी अनिकाच्या नावावर होणार आहे. खरंतर अन्नपूर्णा आजीने प्रॉपर्टीचा ५०-५० टक्के हिस्सा करून तो दोन्ही नातींच्या नावावर करायचा असा निर्णय घेतलेला असतो. पण, हा निर्णय कामिनीला मान्य नसतो. जी नात १७ वर्षे उलटली तरी समोर आली नाहीये, ती आता काय येणार? त्यामुळे या प्रॉपर्टीवर पूर्ण हक्क अनिकाचा आहे असं कामिनी सगळ्या कुटुंबीयांसमोर सांगते. अर्थात, सुरुवातीला अन्नपूर्णा तिचं काहीच ऐकत नाही पण, त्यानंतर राजनने मध्यस्थी केल्यावर अन्नपूर्णासमोर कामिनीची अट मान्य करण्याशिवाय पर्याय नसतो. माझा देवावर पूर्ण विश्वास आहे असं म्हणत अन्नपूर्णा प्रॉपर्टीच्या कागदांवर सह्या करते.दुसरीकडे, कमळी कॉलेजच्या फी संदर्भात चर्चा करण्यासाठी महाजनांच्या घरी येते. पण, अनिका वेगळाच डाव साधते आणि कमळीला घरापासून दूर नेते. तसेच तुला आजीला भेटायचं असेल तर, "माझी गाडी पुसून काढ, स्वच्छ कर" असंही सांगते. कमळी हतबल असते, त्यामुळे परिस्थितीनुसार ती मोठ्या मनाने अनिकाची गाडी पुसते. खिडकीतून सदानंद



महाजन या सगळ्या गोष्टी पाहत असतात. पण, आजारपणामुळे त्यांना त्यांच्या भावना व्यक्त करता येत नसतात, त्यांची वाचाही गेलेली असते. 'कमळी'च्या हातावरची जन्मखूण ते अगदी लगेच ओळखतात आणि अन्नपूर्णाला बाहेर पाहण्यासाठी इशारा करतात. आपली मोठी नात हीच आहे... ती परत आलीये असा इशारा त्यांना द्यायचा असतो पण, परिस्थितीमुळे आणि कामिनीच्या दबावामुळे ते स्वत:च्या भावना व्यक्त करू शकत नाहीत.आता अन्नपूर्णा आपली मोठी नात लवकरात लवकर घरी परत यावी यासाठी एक पूजा करणार आहे. या पूजेचं आमंत्रण आजी तिच्या लाडक्या कमळीला सुद्धा देते. कारण, कमळीच आपली मोठी नात आहे हे सत्य या दोघींनाही माहिती नसतं. पूजेला येण्यासाठी अन्नपूर्णा आजी कमळी आणि तिची मैत्रीण निंगी या दोघींना भेटवस्तू देते.अन्नपूर्णा आजीने दिलेल्या पिशवीत सुंदर साडी आणि पारंपरिक बांगड्या, नथ असते.

## एजाज खान पुन्हा वादात अडकला

अभिनेता एजाज खान मागील काही दिवसांपासून 'हाऊस अरेस्ट' या शोमुळे वादात अडकला आहे. ULLU APP वरील या शोचा होस्ट असलेल्या एजाजने स्पर्धकांना कपडे काढायला सांगितलं होतं, तसेच अश्लील कृत्ये करायला लावली होती. याच शोसंदर्भात एका महिलेने तक्रार दिली आहे. तिने होस्ट एजाज खानवर बलात्काराचा आरोप करत तक्रार नोंदवली आहे. अभिनेता एजाज खानने बलात्कार केल्याचा आरोप एका महिलेने केला आहे. त्याने लग्नाचे आणि त्याच्या 'हाऊस अरेस्ट' या शोमध्ये काम देण्याचे आमिष दाखवून अत्याचार केला,याप्रकरणी मुंबईतील चारकोप पोलीस ठाण्यात त्याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या शोमध्ये अशील कंटेंट दाखवल्याबद्दल आधीच एजाज खानविरोधात तक्रार दाखल करण्यात आली आहे. त्यानंतर आता या महिलेच्या तक्रारीनंतर एजाज पुन्हा एकदा वादात अडकला आहे.

## जिनिलीयाने सांगितली रितेशची आवड

रितेश व जिनिलीया देशमुख यांच्याकडे मनोरंजन विश्वातील आदर्श जोडपं म्हणून पाहिलं जातं. या दोघांची पहिली भेट 'तुझे मेरी कसम' चित्रपटादरम्यान झाली होती. ओळख, मैत्री अन् त्यानंतर या मैत्रीचं रुपांतर प्रेमात झालं. जवळपास १० वर्षे एकमेकांना डेट केल्यावर रितेश व जिनिलीया यांनी २०१२ मध्ये लग्नगाठ बांधली. या जोडप्याला रियान आणि राहिल अशी दोन मुलं आहेत. रितेश-जिनिलीया सोशल मीडियावर कायम चर्चेत असतात. त्यांचे इन्स्टाग्रामवरील मजेशीर रील्स व्हिडीओ सर्वत्र नेहमीच व्हायरल होत असतात. वैयक्तिक आयुष्यात, रितेश-जिनिलीया शाकाहारी असून त्यांनी काही वर्षांपूर्वी 'इमॅजिन मीट्स' हा प्लान्ट बेस्ड खाद्यपदार्थांचा ब्रँड सुरू करून जीवनशैलीत काही महत्त्वाचे बदल केले.रितेश देशमुख हेल्दी राहण्यासाठी चहा-कॉफीचं सेवन देखील करत नाही. याविषयी जिनिलीयाने 'हॉटरफ्लाय'ला दिलेल्या मुलाखतीत खुलासा केला होता. रितेश आणि जिनिलीयाला सुरुवातीला, "तुम्ही आयुष्यभर कोणता एक पदार्थ खाऊ शकता? असा पदार्थ सांगा ज्याचा तुम्हाला कधीच कंटाळा येणार नाही..." हा प्रश्न विचारण्यात आला. यावर रितेशने वडापाव तर, जिनिलीयाने शेवपुरी मी कधीही खाऊ शकते हे उत्तर दिलं.यानंतर या जोडप्याला "कॉफी की चहा? तुम्हाला काय आवडतं?" हा प्रश्न रॅपिड फायरमध्ये विचारण्यात आला. यावर जिनिलीया म्हणाली, "मी कॉफी पिते. रितेश चहा-कॉपी दोन्ही गोष्टी पीत नाही. तो ग्रीन टी पितो.



## 2.45 तासांचा क्राइम थ्रिलर सिनेमा

अलीकडच्या काळात दाक्षिणात्य चित्रपटांना प्रेक्षकांचा खूप चांगला प्रतिसाद मिळत आहे. तमिळ व मल्याळम भाषेतील अनेक चित्रपट सत्य घटनेवर आधारित आहेत. असाच एक चित्रपट ४ वर्षांपूर्वी आला होता. हा लीगल ड्रामा चित्रपट तुम्ही आता ओटीटीवर पाहू शकता. चित्रपट हा फक्त मनोरंजनासाठी नाही, समाजात बदल घडवून आणण्यासाठी ते एक शक्तिशाली माध्यम आहे. दक्षिण भारतीय चित्रपटांनी या बाबतीत अनेक दमदार चित्रपट दिले आहेत. कॉमेडी, ॲक्शन, सस्पेन्स थ्रिलर अशा विविध शैलींमध्ये प्रेक्षकांना आकर्षित करणाऱ्या दक्षिण चित्रपटांनी लीगल ड्रामामध्येही आपली खासियत दाखवली आहे.२०२१ मध्ये प्रदर्शित झालेला 'जय भीम' हा एका सत्य घटनेवर आधारित कायदेशीर थ्रिलर चित्रपट आहे. या चित्रपटाने प्रेक्षकांची मनं जिंकली होती. या चित्रपटाने समाजातील वंचित घटकाच्या समस्या जगासमोर मांडल्या होत्या.या चित्रपटात तमिळ सुपरस्टार सूर्याने वकिलाची भूमिका साकारली होती. या चित्रपटातील त्याच्या दमदार अभिनयाचं प्रचंड कौतुक झालं होतं. सूर्याच्या 'जय भीम' चित्रपटाला IMDB वर १० पैकी ८.७ रेटिंग मिळाले आहे. सूर्याने यापूर्वी 'गजनी' आणि 'सिंघम' सारख्या चित्रपटांमध्ये ॲक्शन हिरो म्हणून स्वतःची ओळख निर्माण केली होती, परंतु या चित्रपटातील त्याच्या भावनिक अभिनयाने चाहत्यांना आश्चर्यचकित



## सोनल आता चित्रपटांमध्ये फार दिसत नाही

बॉलीवूडमध्ये असे अनेक स्टार आहेत, ज्यांना बरीच वर्षे संघर्ष करून इंडस्ट्रीत काम मिळवलं. तर काही लोक असे आहेत ज्यांना वर्षानुवर्षे कठोर परिश्रम करूनही यश मिळालं नाही. काही कलाकार तर पहिल्या चित्रपटामुळे रातोरात यशाच्या शिखरावर पोहोचले, पण त्यांचे स्टारडम फार काळ टिकले नाही. आज आम्ही तुम्हाला अशाच एका अभिनेत्रीबरोबर सांगणार आहोत, जिने एकाच चित्रपटात ५-१० नव्हे तर तब्बल ३० किसिंग सीन दिले होते. पण तरीही तिचं करिअर मात्र यशस्वी झालं नाही. आपल्या अभिनय व बोल्डनेसमुळे चर्चेत राहणाऱ्या या अभिनेत्रीचं नाव सोनल चौहान. मागच्या काही वर्षांपासून मोठ्या पडद्यापासून दूर असलेल्या या अभिनेत्रीने बरेच चित्रपट केले आहेत. पण तिला हवं तसं यश मिळालं नाही.उत्तर प्रदेशातील नोएडा येथे जन्मलेल्या सोनल चौहानने २००५ मध्ये मिस वर्ल्ड टुरिझमचा किताब जिंकला. त्यानंतर ती हिमेश रेशमियाच्या 'समझो ना' या गाण्यात दिसली आणि मग तिने हिंदी चित्रपटांमध्ये प्रवेश केला.सोनल चौहानचा पहिला चित्रपट इमरान हाशमीसोबतचा 'जन्नत' होता. जो २००८ मध्ये प्रदर्शित झाला होता. या चित्रपटामुळे ती रातोरात स्टार बनली. पण त्यानंतर, अभिनेत्रीचा कोणताही चित्रपट मोठ्या पडद्यावर काही कमाल करू शकला नाही. २०१३ मध्ये, ती '३जी – अ किलर कनेक्शन' या चित्रपटात दिसली. या चित्रपटात तिच्यासोबत अभिनेता नील नितीन मुकेश होता.या चित्रपटात सोनल व नितीनने ३० किसिंग सीन दिले होते, पण तरीही चित्रपट बॉक्स ऑफिसवर आदळला होता. चित्रपट फ्लॉप झाल्यावर सोनाल दाक्षिणात्य चित्रपटांकडे वळली. तिथे तिने अनेक मोठ्या स्टार्सबरोबर तिने काम केलं आणि हिट चित्रपट दिले. सोनलने 'बुड्ढा होगा तेरा बाप', 'जॅक अँड दिल', 'द घोस्ट' सारखे चित्रपट केले केलं.

## बुद्धिबळ स्पर्धा — प्रज्ञानंदने ‘लाइव्ह रेटिंग’च्या क्रमवारीत तिसऱ्या स्थानी झेप घेतली

# प्रज्ञानंदचा गुकेशवर विजय!

### अलिरेझा फिरुझा यांच्यात बरोबरी



। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**ग्रँडमास्टर आर. प्रज्ञानंदने सिंकेफिल्ड चषक बुद्धिबळ स्पर्धेची दमदार सुरुवात करताना पहिल्या फेरीत भारतीय सहकारी जगज्जेत्या दोम्माराजू गुकेशवर मात केली. या कामगिरीसह त्याने ‘लाइव्ह रेटिंग’च्या क्रमवारीत तिसऱ्या स्थानी झेप घेतली. अमेरिकेच्या सेंट लुइस येथे सुरू झालेल्या या स्पर्धेत यजमान देशाच्या लेव्हॉन अरोनियनने उझबेकिस्तानच्या नोदिरबेक अब्दुसत्तोरोवचा पराभव केला. त्यामुळे पहिल्या फेरीनंतर प्रज्ञानंद आणि अरोनियन संयुक्तपणे आघाडीवर होते. अन्य लढतींत, अमेरिकेचा फॅबियानो कारुआना आणि पोलंडचा यान-क्रिस्टोफ डुडा, अमेरिकेचे सॅम्युएल सॅव्हिएन आणि वेस्ली सो, फ्रान्सचे मॅक्सिम व्हॅचिएर-लाग्रेव्ह आणि अलिरेझा फिरुझा यांच्यात बरोबरी झाली.**

गुकेशविरुद्ध पांढऱ्या मोहऱ्यांनी खेळताना प्रज्ञानंदने चमक दाखवली. गुकेशने सुरुवातीलाच चाली रचण्यासाठी वेळ घेतला. त्याने वजिराची अदलाबदल करण्याच्या दृष्टीने पावले उचलली. मात्र, प्रज्ञानंदकडे उंटाचे दोन्ही मोहरे शाबूत असल्याने तो भक्कम स्थितीत राहिला. त्यानंतर गुकेशला वेळेचे गणित साधणे अवघड जाऊ लागले. दुसरीकडे प्रज्ञानंदने झटपट चाली रचून प्रतिस्पर्ध्यावर दडपण राखले.अवघड स्थितीतून गुकेशला मार्ग काढता आला नाही आणि अखेरीस ३६ चालींनंतर त्याने हार मान्य केली. “आज नक्की काय झाले ते समजले नाही. गुकेश बहुधा लक्षपूर्वक खेळला नाही. गेल्या वर्षी, मी त्याच्याविरुद्ध विजयाची संधी दवडली होती. पारंपरिक प्रकारात (क्लासिकल) मी जवळपास दोन वर्षांपासून गुकेशला हरवू शकलो नव्हतो. त्यामुळे हा विजय खूप खास आहे,” अशी प्रतिक्रिया प्रज्ञानंदने व्यक्त केली.ग्रँडमास्टर आर. प्रज्ञानंदने सिंकेफिल्ड चषक बुद्धिबळ स्पर्धेची दमदार सुरुवात करताना पहिल्या फेरीत भारतीय सहकारी जगज्जेत्या दोम्माराजू गुकेशवर मात केली. या कामगिरीसह त्याने ‘लाइव्ह रेटिंग’च्या क्रमवारीत तिसऱ्या स्थानी झेप घेतली.अमेरिकेच्या सेंट लुइस येथे सुरू झालेल्या या स्पर्धेत यजमान देशाच्या लेव्हॉन अरोनियनने उझबेकिस्तानच्या नोदिरबेक अब्दुसत्तोरोवचा पराभव केला. त्यामुळे पहिल्या फेरीनंतर प्रज्ञानंद आणि अरोनियन संयुक्तपणे आघाडीवर होते. अन्य लढतींत, अमेरिकेचा फॅबियानो कारुआना आणि पोलंडचा यान-क्रिस्टोफ डुडा, अमेरिकेचे सॅम्युएल सॅव्हिएन आणि वेस्ली सो, फ्रान्सचे मॅक्सिम व्हॅचिएर-लाग्रेव्ह आणि अलिरेझा फिरुझा यांच्यात बरोबरी झाली.

गुकेशविरुद्ध पांढऱ्या मोहऱ्यांनी खेळताना प्रज्ञानंदने चमक दाखवली. गुकेशने सुरुवातीलाच चाली रचण्यासाठी वेळ घेतला. त्याने वजिराची अदलाबदल करण्याच्या दृष्टीने पावले उचलली. मात्र, प्रज्ञानंदकडे उंटाचे दोन्ही मोहरे शाबूत असल्याने तो भक्कम स्थितीत राहिला. त्यानंतर गुकेशला वेळेचे गणित साधणे अवघड जाऊ लागले. दुसरीकडे प्रज्ञानंदने झटपट चाली रचून प्रतिस्पर्ध्यावर दडपण राखले. अवघड स्थितीतून गुकेशला मार्ग काढता आला नाही आणि अखेरीस ३६ चालींनंतर त्याने हार मान्य केली. “आज नक्की काय झाले ते समजले नाही. गुकेश बहुधा लक्षपूर्वक खेळला नाही. गेल्या वर्षी, मी त्याच्याविरुद्ध विजयाची संधी दवडली होती. पारंपरिक प्रकारात (क्लासिकल) मी जवळपास दोन वर्षांपासून गुकेशला हरवू शकलो नव्हतो. त्यामुळे हा विजय खूप खास आहे,” अशी प्रतिक्रिया प्रज्ञानंदने व्यक्त केली.

### गुकेशला मार्ग काढता आला नाही

गुकेशने सुरुवातीलाच चाली रचण्यासाठी वेळ घेतला. त्याने वजिराची अदलाबदल करण्याच्या दृष्टीने पावले उचलली. मात्र, प्रज्ञानंदकडे उंटाचे दोन्ही मोहरे शाबूत असल्याने तो भक्कम स्थितीत राहिला. त्यानंतर गुकेशला वेळेचे गणित साधणे अवघड जाऊ लागले. दुसरीकडे प्रज्ञानंदने झटपट चाली रचून प्रतिस्पर्ध्यावर दडपण राखले. अवघड स्थितीतून गुकेशला मार्ग काढता आला नाही.

# ‘पीसीबी’च्या करारात बाबर, रिझवानची पदावनती

## ट्वेन्टी-20 संघातून वगळल्यानंतर आणखी एक धक्का




। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**आशिया चषक स्पर्धेसाठी ट्वेन्टी-२० संघातून वगळण्यात आलेल्या बाबर आझम आणि मोहम्मद रिझवान या अनुभवी फलंदाजांना पाकिस्तान क्रिकेट मंडळाने (पीसीबी) आणखी एक धक्का दिला आहे. ‘पीसीबी’च्या वार्षिक कराराच्या यादीत या दोघांची ‘ब’ श्रेणीत पदावनती करण्यात आली आहे.**

‘पीसीबी’ला सर्वोच्च ‘अ’ श्रेणीत स्थान देण्यायोग्य एकही खेळाडू वाटला नाही. वार्षिक कराराच्या यादीत एकूण ३० खेळाडूंना स्थान देण्यात आले असून त्यांची ‘ब’, ‘क’ आणि ‘ड’ श्रेणीत विभागणी करण्यात आली आहे. त्यांच्याशी किती रकमेचा करार करण्यात आला हे मात्र स्पष्ट करण्यात आलेले नाही.‘आयसीसी’च्या स्पर्धांत निराशाजनक कामगिरी केल्याचा बाबर आणि रिझवान यांना फटका बसला आहे. गेल्या वर्षीची ट्वेन्टी-२० विश्वचषक स्पर्धा, तसेच या वर्षी मायदेशात झालेली चॅम्पियन्स करंडक स्पर्धा यात बाबर आणि रिझवानला अपयश आले. याचा विपरित परिणाम पाकिस्तान संघाच्या कामगिरीवरही झाला. त्यामुळेच एकदिवसीय संघाचा कर्णधार असूनही रिझवानला ‘अ’ श्रेणीतील स्थान राखता आले नाही.याउलट ट्वेन्टी-२० संघाचा कर्णधार सलमान अली आघाला ‘क’ श्रेणीतून ‘ब’मध्ये बढती मिळाली.

यंदा १२ नव्या खेळाडूंना वार्षिक कराराच्या यादीत स्थान मिळाले, तर गेल्या वर्षीच्या यादीतून आठ जणांना वगळण्यात आले.

‘ब’ श्रेणीत बाबर, रिझवान, शादाब खान आणि शाहीन शाह आफ्रिदी यांचा समावेश आहे. आशिया चषक स्पर्धेसाठी ट्वेन्टी-२० संघातून वगळण्यात आलेल्या बाबर आझम आणि मोहम्मद रिझवान या अनुभवी फलंदाजांना पाकिस्तान क्रिकेट मंडळाने (पीसीबी) आणखी एक धक्का दिला आहे.‘

### दोघांची ‘ब’ श्रेणीत पदावनती

या स्पर्धेत आठ जोड्यांना थेट प्रवेश देण्यात आला आहे. यात पुरुष एकेरीतील अग्रमानांकित यानिक सिन्नेर आणि कॅटेरिना सिनियाकोवा यांचाही समावेश आहे. पहिल्या फेरीत त्यांची गाठ अग्रमानांकित जेसिका पेगुला आणि जॅक ड्रेपर या जोडीशी पडणार आहे. त्याच वेळी सिन्नेर-सिनियाकोवा पहिल्या फेरीत अॅलेक्झांडर झ्वेरेव आणि बेलिंडा बेंचिच जोडीविरुद्ध खेळणार आहे.

स्मार्ट PCMC SMART CITY

महाईन्यूज™

ePaper

epaper.mahaenews.com

। बुधवार ।

। दि. 20 ऑगस्ट 2025।

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती


# "ग्रामीण भागात आर्थिक सबलीकरणासाठी सहकारच प्रभावी पर्याय"!: खा. डॉ. कोल्हे

## गजानन लोकसेवा सहकारी बँक लि. च्या निघोजे शाखेचे उद्घाटन

। चाकण ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**"ग्रामीण आणि निमशहरी भागाच्या आर्थिक विकासात सहकारी संस्थांची भूमिका मोलाची आहे. केवळ नफा नव्हे, तर सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या सहकारी बँका हे आर्थिक सबलीकरणाचे प्रभावी माध्यम आहेत," असे प्रतिपादन खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी केले.**

गजानन लोकसेवा सहकारी बँक लि. च्या नवीन निघोजे शाखेच्या उद्‌घाटनप्रसंगी बोलत होते. नुकतेच चाकण MIDC परिसरातील निघोजे येथे 'कॅपिटल स्क्वेअर' या व्यावसायिक संकुलात बँकेच्या नव्या शाखेचे उद्‌घाटन खासदार डॉ. अमोल कोल्हे यांच्या हस्ते.झाले.

खासदार कोल्हे पुढे म्हणाले "गजानन बँकेसारख्या संस्थांमुळे ग्रामीण भागातील तरुणांना उद्योग-व्यवसायासाठी भांडवल मिळते, महिला बचतीकडे वळतात आणि छोट्या व्यापाऱ्यांनाही आधार मिळतो. बँकिंग सेवा ही केवळ आर्थिक व्यवहारांची गोष्ट नसून, ती सामान्य नागरिकाच्या स्वप्नांना हातभार लावणारी प्रक्रिया आहे."

या प्रसंगी खेड मतदार संघाचे आमदार बाबाजी काळे, आमदार अमित गोरखे, निघोजे गावच्या सरपंच सुनिता येळवंडे कार्यक्रमाला




उपस्थित होते.

कार्यक्रमाचे गजानन बँक अध्यक्ष योगेश माधवराव बाबर होते. उपाध्यक्ष दिलीप जे. देशमुख, मुख्य कार्यकारी अधिकारी संजय जोशी यांच्यासह संचालक मंडळ उपस्थित होते. योगेश बाबर यावेळी म्हणाले नवीन शाखेच्या माध्यमातून औद्योगिक पट्टा व स्थानिक ग्रामस्थांसाठी जलद, आधुनिक व विश्वासार्ह बँकिंग सेवा उपलब्ध होणार आहे.

# भारतीय अर्थव्यवस्था सहा दश लक्ष डॉलरचा टप्पा पार करेल

## सतीशकुमार शिवन : पीसीयू आयोजित मराठी उद्योजकांच्या जागतिक परिषदेचे दुबई येथे उद्धघाटन

। पिंपरी चिंचवड।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**भारतीय स्वातंत्र्याचे शतक साजरे होत असताना २०४७ मध्ये भारतीय अर्थव्यवस्था सहा दश लक्ष डॉलरचा टप्पा पार करेल. यावेळी आंतरराष्ट्रीय पातळीवर उद्योग व्यवसाय उभारणाऱ्या भारतीय आणि मराठी उद्योजकांचे योगदान उल्लेखनीय असेल असा विश्वास भारत आणि दुबई संयुक्त अरब अमिरातीचे वाणिज्य दूत सतीशकुमार शिवन यांनी व्यक्त केला.**



पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्ट संचलित (पीसीईटी) पिंपरी चिंचवड विद्यापीठ (पीसीयू) च्या वतीने दुबई येथे तीन दिवसीय आंतरराष्ट्रीय जागतिक मराठी उद्योजकता परिषद २०२५ चे आयोजन करण्यात आले आहे. त्याच्या उद्‌घाटन सत्रात पीसीयूचे कुलपती व माजी मंत्री हर्षवर्धन पाटील, माजी राज्यमंत्री विश्वजीत कदम, अल अली ग्रुप ऑफ कंपनीचे कार्यकारी संचालक दुबईचे एच. ई. याकुब अल अली, जेष्ठ शास्त्रज्ञ रघुनाथ माशेलकर, उद्योजक प्रतापराव पवार, जेष्ठ लेखक संदीप वासलेकर, गर्जे मराठीचे संस्थापक अध्यक्ष आनंद गानू, महाराष्ट्र आर्थिक विकास परिषदेचे अध्यक्ष अतुल शिरोडकर, पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्षा पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, उद्योजक अजिंक्य काळभोर, नरेंद्र लांडगे, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई, कार्यक्रमाचे संयोजक सचिन इटकर आदींसह देश विदेशातील विविध क्षेत्रातील प्रमुख उद्योजक उपस्थित होते.

पीसीयू कुलपती हर्षवर्धन पाटील यांनी सांगितले की, दुबई हे जागतिक उद्योग क्षेत्राचे प्रवेशद्वार असून या संधीचा मराठी उद्योजकांना योग्य उपयोग व्हावा या उद्देशाने ही परिषद आयोजित केली आहे. यामध्ये व्यापार, उद्योग क्षेत्रातील उद्योजक मार्गदर्शन करणार आहेत. परदेशातील नोकऱ्यांबरोबरच आता जागतिक उद्योगविश्वातही मराठी माणसाचे पाउल पुढे पडावे, मराठी उद्योजकाला व्यवसायासाठी जगभरात संधी उपलब्ध करून देण्यासाठी जगातील मराठी उद्योजक एकत्र येऊन एकमेकांना सहकार्य करावे या संकल्पनेतून "ग्लोबल इंटरपीनर दुबई २०२५" या परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. यामुळे नवउद्योजकांना नव्या संधी उपलब्ध होणार आहेत.

माजी राज्यमंत्री विश्वजीत कदम म्हणाले की, मराठी उद्योजकांनी नव्या संधी निर्माण होण्यासाठी अधिक लक्ष देणे गरजेचे आहे.

दुबईतील प्रसिद्ध उद्योजक व अल अली समूहाचे एच. इ. याकुब अल अली यांनी सांगितले की, भारतीयांनी दुबईत आपला व्यवसाय वाढवावा. आम्ही त्यांचे सदैव स्वागत करू आणि पूर्ण सहकार्य करण्यास उत्सुक आहोत. जेष्ठ उद्योजक प्रतापराव पवार म्हणाले की, मराठी उद्योजकांनी प्रत्येक क्षेत्रात आघाडी घेतली आहे, परंतु त्याला योग्य व्यवहाराची जोड देणे गरजेचे आहे.

### उद्योजकांना व्यवसायाबरोबर नैतिकता गरजेची

स्वामी ब्रह्मविहारी यांनी उद्योजकांना व्यवसायाबरोबर नैतिकता गरजेची आहे असे सांगितले. महाराष्ट्र आर्थिक विकास परिषदेचे अध्यक्ष अतुल शिरोडकर यांनी महाराष्ट्र राज्य उद्योगांमध्ये अग्रेसर राहण्यासाठी शासन पाठीशी कायम उभे राहील असा विश्वास व्यक्त केला. प्रास्ताविक संयोजक व महाराष्ट्र आर्थिक विकास परिषदेचे उपाध्यक्ष सचिन इटकर यांनी केले. यावेळी प्रमुख मार्गदर्शक यांचे स्वागत गर्जे मराठी चे आंनद गाणू, आभार डॉ. गिरीश देसाई यांनी मानले.


Pune District Education Association's
Seth Govind Raghunath Sable
College of Pharmacy
Saswad, Pune - 412301
D.Pharm/B.Pharm/M.Pharm/Ph.D.
PDEA
Pharmacy Council of India
SPPU Affiliation
NAAC
NAAC Accreditation
Maharashtra State Board of Technical Education
Facilitation & Verification Center for
F. Y. B.Pharm, F.Y.M.Pharm,and
Direct S.Y.B.Pharm Admission 2025–26
Admission Schedule for
F.Y.B.Pharm
Online Registration & Document Upload
07 – 21July 2025 (10:00AM-5:00PM)
Document Verification & Form Confirmation (Physical Scrutiny at FC)
08 – 22 July 2025 (10:00AM-5:00 PM)
Display of Provisional Merit List
25 July 2025
Grievance Submission (Online / at FC)
26– 28 July 2025 (10:00AM-5:00 PM)
Final Merit List
31 July 2025
Your Trusted Facilitation Centre!
FC Code 6372
Important Note:
• Bring all original + Xerox copies of documents
• Late registrations after 14 July are for Non-CAP seats only
"Your First Step Towards a Bright Pharmacy Career!"
Confirm Your Application Now!
Visit Us for Physical Scrutiny
PDEA's Seth Govind Raghunath Sable College of Pharmacy, Saswad
Timings: 10:00 AM – 5:00 PM (including Saturday & Sunday)
Contact: Dr. Nilesh Bhosale – 9860503549

# ‘डीबीटी’च्या माध्यमातून विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप!

## अतिरिक्त आयुक्तांनी शाळांना अचानक भेट देत केली शालेय साहित्याची तपासणी

। पिंपरी चिंचवड ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांनी आज सकाळी अचानक महापालिकेच्या चऱ्होली बु. येथील पंडित जवाहरलाल नेहरू प्राथमिक शाळेला भेट दिली. यावेळी त्यांनी बाकावर बसून विद्यार्थ्यांशी संवाद साधला. तसेच थेट लाभ हस्तांतरण म्हणजेच डीबीटी उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना वाटप करण्यात आलेल्या शालेय साहित्याची तपासणी केली. यंदाच्या वर्षी मिळालेले साहित्य कसे वाटते, याबाबत विद्यार्थ्यांच्या प्रतिक्रियाही त्यांनी जाणून घेतल्या.**



> विद्यार्थ्यांना ‘डीबीटी’च्या माध्यमातून देण्यात येणाऱ्या शैक्षणिक साहित्याचा दर्जा तपासणे व विद्यार्थ्यांच्या या साहित्याबाबत प्रतिक्रिया जाणून घेण्यासाठी आज चऱ्होली बु. येथील पंडित जवाहरलाल नेहरू प्राथमिक शाळेला भेट दिली होती. तसेच महापालिकेच्या शिक्षण विभागाच्या विद्यार्थ्यांसाठी असणाऱ्या योजनांचा त्यांना फायदा कितीपत होत आहे? भारत दर्शन सारख्या उपक्रमांची विद्यार्थ्यांना माहिती आहे का? हे जाणून घेण्याचा उद्देशही या भेटीमागे होता. आगामी काळामध्येही अशा प्रकारे अचानक शाळांना भेट देऊन तपासणी सुरू राहतील.
>
> **- प्रदीप जांभळे पाटील,**
> अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका

पिंपरी चिंचवड महापालिकेने विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटपासाठी डीबीटी उपक्रम सुरू केला आहे. महापालिकेच्या १४६ शाळांमधील विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचा थेट लाभ मिळावा, या उद्देशातून सुरू करण्यात आलेल्या या उपक्रमातून सर्व विद्यार्थ्यांना शालेय साहित्य किट मिळाले आहे का, याची तपासणी आता शिक्षण विभागाने सुरू केली आहे. त्या अनुषंगाने अतिरिक्त आयुक्त जांभळे पाटील यांनी थेट आज चऱ्होली बु. येथील शाळेला अचानक भेट देत तपासणी केली. तसेच विद्यार्थ्यांसोबत संवाद साधत त्यांच्याकडून शैक्षणिक साहित्याचा दर्जा कसा आहे, हे देखील जाणून घेतले.

चऱ्होली बु. शाळेतील जवळपास ९० टक्के विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे कीट मिळाले असल्याचे निर्देशनास आले. तर उर्वरीत विद्यार्थ्यांना अद्याप कीट का मिळाले नाही, याबाबत अतिरिक्त आयुक्त जांभळे पाटील यांनी माहिती घेतली. त्यानंतर तातडीने शैक्षणिक साहित्याचे कीट मागवून घेत विद्यार्थ्यांना वाटप केले. यावेळी सदर शैक्षणिक कीट स्वतःच्या हाताने फोडून त्यामध्ये असणाऱ्या साहित्याची तपासणी जांभळे पाटील यांनी केली. यावेळी काही विद्यार्थ्यांना गणवेश व शूज मिळाले नसल्याचे लक्षात आल्यानंतर जांभळे पाटील यांनी विद्यार्थ्यांना दोन दिवसाच्या आत गणवेश व शूज देण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना दिले. तसेच विद्यार्थ्यांना देण्यात आलेल्या शैक्षणिक साहित्याचा पुरेपूर वापर होईल, याची काळजी घेण्याच्या सूचनाही शाळेच्या शिक्षकांना दिल्या.

### शालेय पोषण आहाराची घेतली माहिती

विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या शालेय पोषण आहाराच्या गुणवत्तेबाबत देखील अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांनी माहिती घेतली. तसेच पोषण आहाराची गुणवत्ता आणि प्रमाण तपासण्यासाठी तो स्वतः खाऊन पाहिला. विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या आहाराची गुणवत्ता ही उत्तमच असावी. त्याची वेळोवेळी शाळेतील मुख्याध्यापक, शिक्षक यांनी तपासणी करावी. त्यामध्ये कुठलाही हलगर्जीपणा करू नका, असे निर्देशही त्यांनी दिले.



Priyadarshani
SCHOOL & JR. COLLEGE
ALANDI


PRIYADARSHANI GROUP OF SCHOOLS
42 Years of Excellence in Education

EDUCATING **MIND & HEART**

ADMISSIONS OPEN
FOR AY 2025-26

Holistic
Empowering
Learning

IT ALL **STARTS HERE**



42
YEARS OF ENRICHING EXPERIENCE OF EDUCATION

55+
NATIONAL & INTERNATIONAL AWARDS ACROSS OUR SCHOOLS

11+
CAMPUSES IN AND AROUND PUNE, MAHARASHTRA

17K+
17,000 STUDENTS ACROSS CAMPUSES

600+
TEACHING AND NON TEACHING STAFF

13K+
13,000 ALUMNI ACROSS GLOBE

**PRIYADARSHANI** GROUP OF SCHOOLS
BHOSARI | INDRAYANI NAGAR | MOSHI | CHAKAN | ALANDI | SHIVAJINAGAR | NANEKARWADI | WANOWRIE | SATARA

+91 8668755826
alandi@priyadarshanischools.org
www.priyadarshanischools.org